लोकमत

## सांगली, सातारा, कोल्हापूरच्या सेक्सवर्कर्सना जीवनावश्यक वस्तू घरपोच

# कोरोनातही 'संग्राम'ची बांधीलकी

**'कोरोना'सारख्या आपत्ती काळात सामाजिक बांधीलकीतून काम केल्याचं समाधान जसं भावनिक असतं, तसं ते आत्मिकही असतं. सांगलीच्या संपदा ग्रामीण महिला (संग्राम) संस्थेनं ते मिळवून दिलं. निमित्त होतं, पुरुष, महिला व तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) सेक्सवर्कर्सना जीवनावश्यक वस्तूंचं कीट पुरवण्याचं....**





**संजय यमगर**

**'संग्राम'** ही सेक्सवर्कर्सच्या आरोग्य आणि हक्कासाठी काम करणारी संस्था. तिचा मी एक कार्यकर्ता. २५ मार्चला 'लॉकडाऊन'मुळं घरातच होतो. सकाळी मेसेज मिळाला की, साडेअकराला काहींचा कॉन्फरन्स कॉल होणार आहे. त्यात मीही होतो. कॉन्फरन्स कॉलवरील चर्चा मदतीबाबत असणार, याची खात्री होती. कारण ज्या-ज्या वेळी पुरुष, महिला व तृतीयपंथी सेक्सवर्कर लोकांवर आपत्ती येते, त्या-त्या वेळी 'संग्राम'नं मदतीचा हात दिलाय, हा आजपर्यंतचा अनुभव.

कॉन्फरन्स कॉल सुरु झाला. त्यात 'संग्राम'च्या मीना शेषू, आरती पै, शीतल प्रताप, शशिकांत माने, शांतीलाल काळे, 'वॅम्प'कडून सांगलीतून माया गुरव, संगीता मनोजी, किरण देशमुख, कविता माळी, मिरजेतून मीनाक्षी कांबळे, आयेशा राय, भारती कांबळे, शारदा कांबळे, बसवा कांबळे, रेणुका काळे व जयश्री कोळी, कऱ्हाडमधून सुजाता जाधव, अमित भोपटे, शशिकांत बनसोडे व रेखा शिंदे, 'मुस्कान'कडून सांगलीतून राजेंद्र पाटील, अस्लम मुल्लाणी, कऱ्हाडमधून अमोल साळुंखे आणि साताऱ्यातून अमर भोंडवे, 'मित्रा' कडून राजेंद्र नाईक, दीपक मोटे व महेश मनोजी, कोल्हापुरातून अमृता सुतार, अफझल बारस्कर, अभिजित साखरे, रवींद्र जाधव व जयदीप उबाळे, इचलकरंजीतून नुरी शेख, इस्माईल शेख, महेश रावळ आणि नितीन खानापुरे यांचा समावेश होता. मीना शेषू सांगत होत्या, 'सध्या सर्वत्र लॉकडाऊन आहे. त्यामुळं पुरुष, महिला आणि तृतीयपंथी (ट्रान्स जेंडर) सेक्सवर्कर्सना जीवनावश्यक वस्तूंची अत्यंत गरज आहे. त्यांना त्या वस्तूंचं वाटप करायचंय.'

त्यांनी आपापल्या भागामध्ये तीन टप्प्यात सर्वेक्षण करण्यास सांगितलं. ज्यांना जेवण करता येत नाही, ज्यांना धान्य दिलं तर जेवण करता येईल आणि ज्यांना काहीच मदत नकोय, अशांचं सर्वेक्षण होतं. ते करताना घ्यायच्या काळजीबाबतही त्यांनी माहिती दिली. त्यानुसार सर्व कार्यकर्त्यांनी सर्वेक्षण करुन मदतीची आकडेवारी तयार केली. सांगली, मिरज, कऱ्हाड, सातारा, कोल्हापूर आणि इचलकरंजी इथल्या एकूण ६८९ लोकांना मदत करण्याचं ठरलं. प्रत्येकी पाच किलो तांदूळ, पाच किलो गव्हाचं पीठ, एक किलो मूग डाळ, एक किलो मसूर डाळ, एक किलो साखर, अर्धा किलो शेंगदाणे, दोन किलो तेल, १०० ग्रॅम चहा पावडर आणि २०० ग्रॅम चटणी पूड द्यायचं ठरलं. ६८९ कीट तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वस्तू लागणार होत्या. 'लॉकडाऊन'मुळं ते मिळणं कठीण होतं; पण मीना शेषू यांनी प्रयत्न करुन ते लगेच उपलब्ध करुन दिलं. माझ्याकडं त्या कीटचं पॅकिंग करायची जबाबदारी होती. एक एप्रिलला दुपारी सर्व माल मिळाला व पहाटे तीनला त्याचं पॅकिंगसुद्धा पूर्ण झालं. सांगलीतील हॉटेल व्यावसायिक प्रवीण शेट्टी यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह एक पॅकिंग अल्पावधीत करुन दिले.

कीट पोहोचविण्यासाठी ट्रकची तसेच परवानगीची गरज होती. सांगली महापालिका आयुक्त नितीन कापडणीस यांनी परवानगी दिली. प्रशासकीय अधिकारी माणकापुरे यांची मदत झाली. सातारा, कऱ्हाड, कोल्हापूर व इचलकरंजीला मदत पाठविण्यासाठी ट्रकचा वाहतूक परवाना सांगली उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विलास कांबळे व साताऱ्याचे संजय राऊत यांनी दिला. 'ऑल इंडिया ट्रान्स्पोर्ट कॉंग्रेसचे व्यवस्थापन'चे सदस्य बाळासाहेब कलशेट्टी यांनी ट्रक विनामूल्य उपलब्ध केला. डिझेलही दिले. नंदू नरुटेंकडे वाहतुकीची जबाबदारी सोपविली. या कामांत 'लोकमत'चे सांगली आवृत्तीप्रमुख श्रीनिवास नागे, 'लोकमत'च्याच साताऱ्याच्या उपसंपादक प्रगती पाटील, मिरजेचे पत्रकार प्रमोद जेरे, प्रशासन, प्रसारमाध्यमांचं सहकार्य मिळालं.

दोन एप्रिलला सर्व कीट ट्रकमध्ये भरली. सांगलीतील राजमाने चाळ, स्वरुप थिएटर व मिरजेतील उत्तमनगर इथं पुरुष, महिला आणि तृतीयपंथी सेक्सवर्कर्सना वाटप केलं. तीन एप्रिलला कऱ्हाड व साताऱ्याला निघालो. पोलिसांनी ट्रक अडविला. सातारा व कऱ्हाडला सेक्सवर्कर्सना धान्याचं कीट देण्यासाठी जात असल्याचं सांगताच, 'चांगलं काम करताय,' असं म्हणत त्यांनी ट्रक सोडला. साताऱ्यात कीटचं वाटप करताना प्रत्येक सेक्सवर्कर्सच्या चेहऱ्यावर समाधान होतं, ते भावनेनं ओथंबलेलं होतं! तिथली सेक्सवर्कर म्हणाली, 'आम्ही भाग्यवान आहोत. कारण अडचणीच्या वेळी आमच्या संस्थेकडून वेळेत मदत पोहोच झाली.'

साताऱ्यातून निघालो. तिघांना महामार्गावरच मदत पोहोच केली. नंतर कऱ्हाडलाही कीट पोहोचविले. संध्याकाळी परत सांगलीत येऊन गोकुळनगरमध्ये व दुसऱ्या दिवशी (४ एप्रिल) कोल्हापूर, इचलकरंजीत कीट वाटप केलं. हा अनुभव माझ्यासाठी नवाच होता. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लोक घरातून बाहेर पडण्यास घाबरत असताना आम्ही कार्यकर्ते मात्र खुशीनं काम करीत होतो. ६८९ कीट तयार करुन ते ट्रकमध्ये भरणं आणि सर्व सेक्सवर्कर्सपर्यंत पोहोचवणं, या कामाचं मनावर दडपण होतं; पण मीना शेषू, आरती पै पाठीशी होत्या. काळजी घेण्याबाबत सांगत होत्या. त्यामुळं हुरुप आला. २५ मार्चला सुरु झालेला मदतीचा प्रवास ४ एप्रिलला संपला! या काळात 'संग्राम'चे सर्वच पदाधिकारी आणि कार्यकर्ते खांद्याला खांदा लावून झटत होते. 'कोरोना'सारख्या आपत्ती काळात सामाजिक बांधीलकीतून वेळेत मदत पोहोच केल्याचं समाधान जसं भावनिक असतं, तसं आत्मिकही असतं, याचा प्रत्यय आला.

**(लेखक, सांगली येथील 'संग्राम'चे कार्यकर्ते आहेत.)**